पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिती

कार्यपत्रिका क्रमांक - १६४

<u>सभावृत्तांत</u>

दिनांक - १३.०४.२०१० वेळ-दुपारी ४.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार दिनांक १३.०४.२०१० रोजी दुपारी ४.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.रामदास तानाजी कुंभार
२. मा.साळुंके राजेंद्र गुलाबराव
३. मा.प्रेमकुमार शंकरन नायर उर्फ बाबू नायर

याशिवाय मा.काळे-नगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------------------

सभा कामकाज उरकणेसाठी आवश्यक गणसंख्या सभागृहात नसल्याने उपस्थित सन्मा. सदस्यांनी मंगळवार दिनांक २०/४/२०१० रोजी दुपारी ३:४५ पर्यंत सभा तहकुब केली.

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिती

कार्यपत्रिका क्रमांक - १६४

<u>सभावृत्तांत</u>

<u>(दि.१३.०४.२०१० ची तहकुब सभा)</u>

दिनांक - २०.०४.२०१० वेळ-दुपारी ३.४५ वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची दि.१३.०४.२०१० ची तहकूब सभा मंगळवार दिनांक २०.०४.२०१० रोजी दुपारी ३.४५ वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.जगदीश शंकर शेट्टी
२. मा.सौ.आशा ज्ञानेश्वर सुर्यवंशी
३. मा.सुरदास तुकाराम गायकवाड
४. मा.आण्णा उर्फ मनोहर पवार
५. मा.सौ.सुलोचना बबन बढे
६. मा.साळुंके राजेंद्र गुलाबराव
७. मा.गावडे जयश्री वसंत
८. मा.सुमनताई मधुकर पवळे

याशिवाय मा.काळे-नगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------------------

(सभा भरविणेसाठी नेमलेल्या वेळी मा.सभापती सभागृहात उपस्थित नव्हते.)

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सुचक : मा.जयश्री गावडे अनुमोदक : मा.राजेंद्र साळुंके

सभा भरविणेसाठी नेमलेल्या वेळी मा.सभापती सभागृहात उपस्थित नसल्याने सभेचे अध्यक्षस्थानी मा.मनोहर पवार यांची निवड करणेत यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

(मा.मनोहर पवार यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले)

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सुचक : मा.जयश्री गावडे                    अनुमोदक : मा.सुलोचना बढे

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे माजी सदस्य रंगनाथ उर्फ अप्पा शितोळे, माजी खासदार शंकरराव बाजीराव पाटील यांच्या पत्नी लीलाताई पाटील, मा.शहर अभियंता एकनाथ उगीले यांच्या मातोश्री मुक्ताबाई पांडुरंगराव उगीले यांचे दु:खद निधन झाले असल्याने त्यांना श्रद्धांजली वाहून गुरुवार दिनांक २२/०४/२०१० रोजी दुपारी २.०० पर्यंत सभा तहकुब करणेत यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

(उपस्थितांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली अर्पण केली.)

मा.सभाध्यक्ष :- गुरुवार दिनांक २२/०४/२०१० रोजी दुपारी २.०० पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे

----------

(मनोहर पवार)
सभाध्यक्ष
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिती

कार्यपत्रिका क्रमांक - १६४

सभावृत्तांत
(दि.१३.०४.२०१०,२०.०४.२०१० ची तहकुब सभा)

दिनांक - २२.०४.२०१० वेळ-दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची दि.२०.०४.२०१० ची तहकूब सभा गुरुवार दिनांक २२.०४.२०१० रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.प्रशांत कृष्णराव शितोळे - सभापती
२. मा.सौ.आशा ज्ञानेश्वर सुर्यवंशी
३. मा.रामदास तानाजी कुंभार
४. मा.सुरदास तुकाराम गायकवाड
५. मा.आण्णा उर्फ मनोहर पवार
६. मा.सौ.सुलोचना बबन बढे
७. मा.सुमनताई मधुकर पवळे
८. मा.साळुंके राजेंद्र गुलाबराव
९. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव
१०.मा.थोरात एकनाथ दादा
११.मा.तानाजी विठ्ठल खाडे
१२.मा.प्रेमकुमार शंकरन नायर उर्फ बाबू नायर
१३.मा.गावडे जयश्री वसंत
१४.मा.सौ.वर्षा विलास मडीगेरी

याशिवाय मा.आशिष शर्मा-आयुक्त,मा.डुंबरे-अति.आयुक्त,मा.देशमुख, मा.कारचे,मा.मुंढे,मा.सावंत,मा.गायकवाड,मा.फडणीस,मा.पवार-सहा.आयुक्त, मा.काळे-नगरसचिव, मा.चव्हाण-अति.शहर अभियंता, मा.सावळे-अति.अधिक्षक अभियंता, मा.तुपे-सह शहर अभियंता,मा.सुरगुडे-विकास अभियंता,मा.डॉ.कुणचगी-आरोग्य वैद्यकीय अधिकारी,मा.पाटील-उपसंचालक (नगररचना), मा.लोंढे-मुख्य लेखापाल,मा.कांबळे,मा.जाधव,मा.कुदळे,मा.थोरात,मा.ढगे,मा.बनकर,मा.चव्हाण, मा.दुधेकर,मा.चिंचवडे,मा.पाटील,मा.सवणे,मा.पठाण-कार्य.अभियंता,मा.पोमण-संगणक अधिकारी,मा.जाधव-शिक्षणाधिकारी (माध्य.), मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक, मा.गावडे-अग्निशामक अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------------------

मा.आशा सुर्यवंशी :- मा.स्थायी समिती सभा दिनांक ६.४.२०१० ठराव क्र.१०९२२ मध्ये "र.रु.७,३१,९९७/-चे खर्चास" या मजकूरानंतर "तसेच आवश्यकतेनुसार वाढीव ७ नग सदरचे दराने व अटीशर्तीनुसार मे.वैभव ट्रेडर्स यांचेकडून खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास" हा मजकूर समाविष्ट करणेची तसेच ठराव क्र.१०९४८ मध्ये "ॲम्बिशियस स्पोर्टस् क्लब" हा मजकूर वगळून त्याऐवजी "व्ही.के.स्पोर्टस् क्लब" हा मजकूर समाविष्ट करणेची दुरुस्ती करणेत यावी.

मा.स्थायी समिती सभा दिनांक ६.४.२०१० ठराव क्र.१०९२२ मध्ये "र.रु.७,३१,९९७/-चे खर्चास" या मजकूरानंतर "तसेच आवश्यकतेनुसार वाढीव ७ नग सदरचे दराने व अटीशर्तीनुसार मे.वैभव ट्रेडर्स यांचेकडून खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास" हा मजकूर समाविष्ट करणेची तसेच ठराव क्र.१०९४८ मध्ये "ॲम्बिशियस स्पोर्टस् क्लब" हा मजकूर वगळून त्याऐवजी "व्ही.के.स्पोर्टस् क्लब" हा मजकूर समाविष्ट करणेची दुरुस्ती करणेत आल्याचे व त्या दुरुस्त्यांसह दिनांक ६.४.२०१० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १६३) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

---------------------

ठराव क्रमांक :- १०९५२ विषय क्रमांक :- १
दिनांक- २२.०४.२०१० विभाग - जकात
सुचक- मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक - मा.रामदास कुंभार
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.दूरसंचार/४९/२०१० दि.२२/२/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

जकात विभागाकडील मे.हच यांची मोबाईल सेवा बंद करून त्याऐवजी मे.आयडीया ची सेवा घेणेस तसेच जकात विभागाकडील विविध अधिकारी व जकात नाकी असे एकूण ५० ठिकाणी वापराची मर्यादा पुर्वी प्रमाणेच कायम सेवा घेणेस व होणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- १०९५३ विषय क्रमांक :- २
दिनांक- २२.०४.२०१० विभाग - विद्युत
सुचक- मा.मनोहर पवार अनुमोदक - मा.सुलोचना बढे
संदर्भ:-मा.सह शहार अभियंता यांचे जावक क्र.विद्युत/नि/१/कावि/५८/१०दि.३१/३/१०

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.५/०९/१० मधील अ.क्र.४ अन्वये, मनपाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील वातानुकुलन व जलशितक यंत्राची वार्षिक पध्दतीने देखभाल व दुरुस्ती करणेकामी मे.आनंद रेफ्रिजरेशन & इले. (नि.र.रू. ३,९९,४८८/- [र.रू.तीन लाख नव्यान्नव हजार चारशे अठ्ठ्याऐंशी] पेक्षा ६ % कमी) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- १०९५४ विषय क्रमांक :- ३
दिनांक- २२.०४.२०१० विभाग - मुख्य उद्यान अधिक्षक
सुचक- मा.सुरदास गायकवाड अनुमोदक - मा.सुमनताई पवळे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/१०/कावी/१९८/१०दि.५/४/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे तळवडे पॉलीहाऊस येथे उत्पादीत जरबेरा फुलांचे पॅकींगसाठी ४०० किलो ४ " x ३ १/२ " साईजच्या प्लॉस्टिक पिशव्या मे.विश्वास प्लॉस्टिक, भोसरी, पुणे-३९. यांचेकडून करारनामा न करता थेट पध्दतीने खरेदी करणेस व त्याकामी येणारे एकूण र.रू.४४,१००/- [र.रू.चव्वेचाळीस हजार शंभर] चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- १०९५५ विषय क्रमांक :- ४
दिनांक- २२.०४.२०१० विभाग - स्थापत्य
सुचक- मा.राजेंद्र साळुंके अनुमोदक - मा.प्रभाकर वाघेरे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/लेखा/७/कावि/१७/१०दि.५/४/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

निविदा नोटीस क्र.१६/२००८-०९ चे शुध्दीपत्रक क्र.१, २ व ३ ची जाहीरात पुणे व मुंबई आवृत्तीमध्ये प्रसिध्द केल्याने दी टाईम्स ऑफ इंडिया यांना एकूण १,७६,९६०/- [र.रू.एक लाख शहात्तर हजार नऊशे साठ] दै.इंडियन एक्सप्रेस यांना एकूण र.रू. ९२,८००/- [र.रू.ब्यान्नव हजार आठशे] या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- १०९५६ विषय क्रमांक :- ५
दिनांक- २२.०४.२०१० विभाग - स्थापत्य
सुचक- मा.एकनाथ थोरात अनुमोदक - मा.तानाजी खाडे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/लेखा/७/कावि/२९४/१० दि.५/४/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

JNNURM अंतर्गत नाशिकफाटा ते वाकड बाह्य वळण मार्गा पर्यंत रस्ता करणे BRTS प्रकल्पातील कामे नि.नो.क्र. ३/२००९-१० ची विशेष जाहीरात प्रसिध्दीकामी दै.दी टाईम्स ऑफ इंडिया (पुणे व मुंबई आवृत्ती) यांना खर्च र.रू. ३,८८,४४०/- [र.रू.तीन लाख अठ्‌ठ्याऐंशी हजार चारशे चाळीस] दै.पुढारी (राज्य आवृत्ती) यांना एकूण खर्च र.रू. १६,८६०/- [र.रू.सोळा हजार आठशे साठ] या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- १०९५७ विषय क्रमांक :- ६
दिनांक- २२.०४.२०१० विभाग - मध्यवर्ती साहित्य भांडार,वैद्यकीय
सुचक- मा.प्रशांत शितोळे अनुमोदक - मा.तानाजी खाडे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मसाभां/५/कावि/१९०/१०दि.३/४/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या वाय.सी.एम.रूग्णालयातील एक्स-रे विभागातील कॉम्प्युटर रेडिओग्राफी (C.R.) हे M/s.Konica Minolta Medical and Graphic inc. या कंपनीचे कॉम्प्युटर रेडिओग्राफी (C.R.) मशीन असलेने केवळ कोनिकाने उत्पादित केलेल्या कॅसेट्स व एक्स-रे फिल्म यांचाच वापर यामध्ये करावा लागत असल्याने सदर सिस्टिमकरीता तातडीने आवश्यक लागणाऱ्या सी.आर. फिल्म व कॅसेट उत्पादीत कंपनी M/s.Konica Minolta Medical and Graphic inc. यांचे एकमेव अधिकृत विक्रेते M/s. Medicon Healthcare Pvt. Ltd., यांचे समवेत निविदा न मागविता करारनामा करून त्यांनी सादर केलेल्या कोटेशन दरानुसार एक्स-रे फिल्म व एक्स-रे केमीकल या लेखाशिर्षावरील सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षातील मंजुर तरतुदीमधून सी.आर.फिल्म र.रू.३३,२८,७५०/- [र.रू.तेहतीस लाख अठ्ठावीस हजार सातशे पन्नास] आणि उपकरणे खरेदी या लेखाशिर्षावरील सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षातील मंजुर तरतुदींमधून सी.आर. कॅसेट र.रू. २९,७५,५००/- [र.रू.एकोणतीस लाख पंच्याहत्तर हजार पाचशे] खरेदी करण्यास व यापुढील कालावधीकरीता आवश्यक लागणाऱ्या सी.आर. फिल्म व सी.आर.कॅसेट कोटेशन दरानुसार करारनाम्यास अधिन राहून संबंधीत ठेकेदाराकडून खरेदी करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :-१०९५८ विषय क्रमांक :- ७
दिनांक- २२.०४.२०१० विभाग - यशवंतराव स्मृती रुग्णालय
सुचक- मा.वर्षा मडीगेरी अनुमोदक - मा.आशा सुर्यवंशी
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वायसीएमएच/१अ/कावि/६१/२०१० दि.६/४/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

वाय.सी.एम.रूग्णालयाकरिता आवश्यक १)Breast Feeding pump-Symphony १ नग, २)Cyro Gun Basco १ नग, ३)Oscillatory Bone Cutting saw १ नग, ४)Tourniquet-pitkar, mecktronic Diamond-१ नग, ५)Orthotic Alignment Device-Endolite, Alimco १ नग प्राप्त E-Tendering निविदेतील दरानुसार M/s.Om Enterprises यांचेकडून खरेदीस व त्याकामी येणाऱ्या र.रू.२,६३,०००/- [र.रू.दोन लाख त्रेसष्ट हजार] चे खर्चास तसेच त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- १०९५९ विषय क्रमांक :- ८
दिनांक- २२.०४.२०१० विभाग - ड प्रभाग
सुचक- मा.रामदास कुंभार अनुमोदक - मा.मनोहर पवार
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.ड/७/कावि/१५७/१० दि.३/४/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

खाजगी रिक्षा टेम्पोव्दारे घरोघरचा कचरा गोळा करणेकामी प्रस्तावात नमुद रिक्षा टेम्पोधारक यांच्याकडून प्रतिदिन प्रति टेम्पो र.रू.७००/- प्रमाणे ७ टेम्पोचे र.रू.४,९००/- प्रतिदिन या दराने दि.१/१/२०१० पासून जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत नवीन हॉपर्स वाहने येईपर्यंत येणाऱ्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- १०९६० विषय क्रमांक :- ९
दिनांक- २२.०४.२०१० विभाग - यशवंतराव स्मृती रुग्णालय
सुचक- मा.सुलोचना बढे अनुमोदक - मा.सुमनताई पवळे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वायसीएमएच/एमएस/कावि/१२५/१० दि.६/४/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

वैद्यकीय क्षेत्रातील विविध संस्थांकडून विद्यार्थ्यांकरीता हेल्थ सायन्सेस तसेच Nursing Clinical Experience साठी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी विनंती अर्ज करण्यात येत असल्याने सदर विद्यार्थ्यांना निरीक्षणासाठी प्रत्येक अभ्यासक्रमाच्या बाबतीत प्रती रू.२५/- प्रती दोन तास प्रती विद्यार्थी याप्रमाणे शुल्क आकारण्यास तसेच Nursing Clinical Experience साठी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी रू.४२०/- प्रती महा प्रती विद्यार्थी याप्रमाणे शुल्क आकारून परवानगी देणेबाबत

मा.वैद्यकीय संचालक/मा.वैद्यकीय अधिक्षक यांना शासन परिपत्रकानुसार फी आकारून अनुमती देण्यास परवानगी देण्याचे अधिकार प्रदानास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- १०९६१ विषय क्रमांक :- १०
दिनांक- २२.०४.२०१० विभाग - नागरवस्ती विकास योजना
सुचक- मा.राजेद्र साळुंके अनुमोदक - मा.प्रभाकर वाघेरे
संदर्भ:-मा.अतिरिक्त आयुक्त यांचे जावक क्र.नाविया/९/कावि/१७३/१०दि.७/४/२०१०

मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

नागरवस्ती विकास योजना विभागातील महिला व बालकल्याण योजने अंतर्गत योजना क्र.८ नोंदणीकृत महिला संस्थेस / महिला बचतगट, महासंघाना व्यवसायासाठी बँकेकडून मिळणाऱ्या कर्ज रक्कमेनुसार अर्थसहाय्य देणे या योजने अंतर्गत जाणता राजा स्वयंसहाय्यता महिला बचतगट, पिंपरी, पुणे-१७ या पात्र बचतगटाला प्रकल्प खर्चाच्या ५० % प्रमाणे अनुदान [र.रू.२,५०,०००/- ] अदा करण्यास व त्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :-१०९६२ विषय क्रमांक :- ११
दिनांक- २२.०४.२०१० विभाग - विद्युत
सुचक- मा.एकनाथ थोरात अनुमोदक - मा.तानाजी खाडे
संदर्भ:-मा.सह शहर अभियंता यांचे जावक क्र.विद्युत/नि/१/कावि/६३/१०दि.७/४/१०

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.१४/०९/१० मधील अ.क्र.२ अन्वये, जकात विभागासाठी वायरलेस यंत्रणा उभारणेकामी मे.प्रथमेश एंटरप्रायजेस (नि.र.रू.९,४९,०९४/- [र.रू.नऊ लाख एकोणपन्नास हजार चौऱ्यान्नव] पेक्षा १.२० % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :-१०९६३ विषय क्रमांक :- १२
दिनांक- २२.०४.२०१० विभाग - विद्युत
सुचक- मा.प्रेमकुमार नायर अनुमोदक - मा.जयश्री गावडे
संदर्भ:-मा.सह शहर अभियंता यांचे जावक क्र.विद्युत/नि/१/कावि/६२/१०दि.७/४/१०

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.१४/०९/१० मधील अ.क्र.१ अन्वये, सुरक्षा विभागाकरीता वायरलेस यंत्रणा उभारणेकामी मे.प्रथमेश एंटरप्रायजेस (नि.र.रू.९,९६,७००/- [र.रू.नऊ लाख शहान्नव हजार सातशे] पेक्षा १ % कमी) या

सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(प्रशांत कृष्णराव शितोळे)
सभापती
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक- नस/९/कावि/५३६/२०१०
दिनांक - २३/०४/२०१० चे लगत

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.